I. O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** मोधा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0399 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/10/2023 00:04

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 11/09/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/09/2023
**Time From (वेळेपासून):** 13:52 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/10/2023 **Time (वेळ):** 23:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 065

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/10/2023 23:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** शिवरामनगर, परभणी ,तलाठी सज्जा परभणी पुर्व , यांचे खाजगी तलाठी कार्यालया सम, परभणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** बालाजी विश्वनाथराव जावळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1993

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | रा नसिंह नगर, खानापुर फाटा,पिंगळी रोड, परभणी,परभणी,मोधा,परभणी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | रा नसिंह नगर, खानापुर फाटा,पिंगळी रोड, परभणी,परभणी,मोधा,परभणी, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9561953415

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | हर्षवर्धन प्रकाश सुर्यवंशी | | | 1. वर्मा नगर,परभणी,मोधा,परभणी, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 11/10/2023

मी बालाजी विश्वनाथराव जावळे, वय 30 वर्ष, रा नृसिंह नगर, खानापुर फाटा, पिंगळी रोड, परभणी. मो. क्र. 9561953415.

मी आज रोजी फिर्याद देतो की, मी दि. 24/06/2021 रोजी श्रीमती शामला सुभाष पतंगे यांचेकडून परभणी महानगर पालीका हद्दीतील खानापुर येथील सर्वे न. 47 गट न. 113 मध्ये 0.88 आर क्षेत्रफळ असलेले खुले प्लॉट त्याचा भुखंड नं. 30 व वार्ड नं. 12 मधील घर नंबर 2207 हा खरेदी केला आहे. सदर खरेदी केलेल्या भुखंडाचा फेरफार करून सातबाराला नाव लावण्यासाठी तलाठी सज्जा परभणी पुर्व यांचे आर.आर. पेट्रोल पंपाजवळील खाजगी तलाठी कार्यालयात गेलो. तेथील लोकसेवक तलाठी देगावकर यांनी प्लॉटचे फेरफार करता येत नाही असे सांगीतले. त्यामुळे मी दि. 04/08/2023 रोजी तलाठी देगावकर यांना रितसर अर्ज कागदपत्रांसह सादर केला. त्याबाबत तलाठी देगावकर यांनी मला पोच पावती दिली नाही. परंतु त्यांच्या कार्यालयातील खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी मला तलाठी कार्यालयाचे बाहेर भेटले. त्यावेळी त्यांनी मी खरेदी केलेला प्लॉट माझे नावे सातबाराला लावण्याकरीता 15,000/- रूपये लागतील असा म्हणाला. त्यावर मी त्यांना एवढे पैसे कशासाठी लागतात असे विचारले असता त्यांनी तुम्ही महानगरपालीकेला प्लॉट लावला नाही व गुंठेवारी रेग्युलेशन केलेले नाही. ते सर्व आम्ही अॅडजस्ट करतो म्हणुन पैसे लागतात असे सांगीतले.

दि. 31/08/2023 रोजी मी तलाठी कार्यालयात गेलो तिथे माझा अर्ज सापडत नसल्याने माझे कडील पत्रावर तलाठी देगावकर यांना पोच मागीतली. त्यांनी माझ्या अर्जावर सही करून पोच देण्याएवजी मनपा मधुन गुंठेवारी नियमानुकुल करून सादर करा असा शेरा मारला. मी दि. 11/09/2023 रोजी त्यांना भेटण्यास जाणार आहे. तिथे तलाठी देगावकर किंवा खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी यांनी लाचेची मागणी केल्यास किंवा लाच स्विकारल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी येथे दि. 11/09/2023 रोजी दिली आहे.

त्यावरून त्याच दिवशी पोलीस उपअधीक्षक श्री. इप्पर यांनी तात्काळ आगार व्यवस्थापक, रा.प.म. परभणी यांना पत्र देवून दोन शासकीय पंच म्हणुन 1) मोहम्मद अब्दुल शाकेर अब्दुल रशीद काझी, वाहक बि.नं. 9440, रा.प. परभणी आणि 2) किशन वैजनाथ शिंदे, चालक बि.न. 17999, रा.प.म. परभणी यांना उपलब्ध करून घेतले. दोन्ही पंचांची व माझी ओळख करून देण्यात आली. मी त्यांना माझी तक्रार तोंडी कथन केली. तसेच पोलीस उपअधीक्षक श्री. इप्पर यांनी माझी हस्तलिखीत तक्रार पंचांना वाचण्यास दिली.

त्यानंतर प्रत्यक्ष कार्यवाहीला सुरूवात करण्यात आली. आंम्हाला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून दोन्ही पंच तसेच सापळा पथकातील अधिकारी व माझे वक्तव्य डिजीटल व्हाईस रेकॉर्डरच्या सहाय्याने पोशि/अतुल कदम यांनी रेकॉर्ड केले. पडताळणी कार्यवाही दरम्यान मी व पंच क्र 1 मोहम्मद अब्दुल शाकेर असे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरसह आर.आर. पेट्रोल पंपाजवळील परभणी पुर्व तलाठी सज्याचे खाजगी कार्यालयाबाहेर गेलो. तेथे तलाठी कार्यालयासमोरील ओटयावर उभा असलेला खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी याच्याकडे तलाठी देगावकर यांच्या बद्दल मी विचारणा केली. त्यावेळी त्याने खरेदी केलेल्या भुखंडाचे फेरफार करून सातबाराला नाव लावण्यासाठी सुरूवातीस 15,000/- रूपये लागतील असे म्हणुन लाचेची मागणी केली असता मी त्यांना असमर्थता दाखवली तेंव्हा खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी म्हणाले की 'ते सात म्हणु लागले'असे म्हणुन त्यांनी तलाठी देगावकर यांचे नावे तडजोड अंती 7,000/- रू घेण्याचे मान्य केले. त्यावरून लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच त्याने खरेदी खताची सर्टिफाईड कॉपी सोबत घेवुन येण्यास सांगीतले. त्यावेळी तलाठी देगावकर हे बाहेरून कार्यालयात जात असतांना त्यांनी देखील खरेदी खताची सर्टिफाईड कॉपी आणुन देण्यास सांगीतले त्यामुळे आंम्ही दोघे तेथून निघुन ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो. तिथे पंचासमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण ऐकुन त्याची स्क्रिप्ट तयार करण्यात आली. खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी याने लाच मागणी केल्याचे स्पष्ट झाले. तलाठी कार्यालयातील

तलाठी देगावकर यांची लाच मागणी बाबत पडताळणी करणे आवश्यक असल्याने सापळा अधिकारी आणि पंचांनी तलाठी देगावकर यांची पडताळणी झाल्यानंतरच लाच रक्कम देण्याचा सापळा आयोजीत करण्याचे ठरविले. त्यानंतर दिनांक 12/09/2023 व 14/09/2023 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही मध्ये तलाठी देगावकर यांची भेट झाली नाही. दिनांक 15/09/2023 रोजी करण्यात आलेलया पडताळणी कार्यवाही दरम्यान तलाठी देगावकर यांची भेट झाली. त्यांचे सोबत माझे कामाविषयी चर्चा झाली परंतु त्यांनी मला कसल्याही प्रकारे लाचेची मागणी केली नाही.
दि. 18/09/2023 रोजी तलाठी देवगावकर हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित नसल्याने त्यांची भेट होऊ शकली नाही. दि. 20/09/2023 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालयात आलो. तेथे मी पंचासमक्ष तलाठी देगावकर यांना मोबाईल फोन व्दारे संपर्क केला असता त्यांनी मी कॉल केल्यावर खाजगी तलाठी कार्यालयात येण्यास सांगीतले.
दि. 25/09/2023 रोजी मी पंच क्रमांक 01 यांच्यासह तलाठी देगावकर यांना त्यांचे कार्यालयात जावुन त्यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी मला दोन तीन दिवसात तुमचे काम होईल. मी फोन लावुन स्पॉट व्हिजीटला येतो असे सांगीतल्याने आम्ही ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो.
दि. 03/10/2023 रोजी मी ला.प्र.वि. कार्यालयात हजर आलो असता पंच क्र. 1 मोहम्मद अब्दुल शाकेर हे रजेवर गेल्याने त्यांचे ऐवजी किशन वैजनाथ शिंदे यांना पंच क्र. 01 म्हणुन माझे सोबत तलाठी देगावकर यांची भेट घेवुन पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 शिंदे असे तलाठी देगावकर यांचे खाजगी तलाठी कार्यालयात गेलो. तेथे तलाठी देगावकर हजर नव्हते. तेथील खाजगी इसम सुर्यवंशी यांनी मला पाच हजार आठशे साठ रूपयाचे चालान देवुन भरण्यास सांगीतले. त्यानंतर त्याने मला मंडळ अधिकारी यांचा संप संपताच सातबारा मिळणार असल्याचे सांगुन काम झाल्यानंतर 'तुमच्या मनान काय द्यायच ते द्या'असे म्हणुन पुन्हा एकदा लाचेची मागणी केली.
दि. 04/10/2023 रोजी मी खाजगी इसम सुर्यवंशी याने दिलेले चालान बॅंकेत भरना केल्याने ते चालान तलाठी कार्यालयात नेउन देण्यासाठी जाणार होतो. त्याच दिवशी पंचासमक्ष पडताळणी कार्यवाही करण्यात आली. त्यादरम्यान माझी भेट तलाठी देगावकर यांच्याशी झाली. त्यांना मी भरलेले चलन दिले. त्यांनी मला चार पाच दिवसात तुमचे काम होउन जाईल असे कळवीले. तेंव्हा मी त्यांना तुमच्या कार्यालयातील सुर्यवंशी याने काम झाल्यानंतर फुल नाही फुलाची पाकळी तरी द्या असे सांगितले होते असे म्हणालो. तेंव्हा तलाठी देगावकर यांनी काही द्याव लागत नाही... चलन भरल्यावर काय द्यावे लागत नाही म्हणुन लाचेची मागणी केली नाही. त्यानंतर मी व पंच क्र. 01 शिंदे ला.प्र.वि. कार्यालयात परत आलो. त्यांनतर सातबाराला नोंद झाल्यावर सर्वानुमते दि. 11/10/2023 रोजी खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी यांनी केलेल्या लाच मागणी नुसार सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले.
दि. 11/10/2023 रोजी मला व दोन्ही पंचांना लाप्रवि कार्यालयात सापळा पुर्व कार्यवाही दरम्यान अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट लॅम्पच्या गुणधर्माबाबत पोलीस कर्मचारी भुमकर यांनी माहिती देवुन प्रॅक्टीकल करून दाखवले. त्यानंतर मी लाच म्हणुन देण्यासाठी जमा केलेले 7,000/- रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या 14 नोटांना पोलीस कर्मचारी भुमकर यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावुन ते माझे पॅन्टचे समोरील उजवे खिश्यात ठेवले. पोलीस कर्मचारी भुमकर याना वगळुन सापळा कार्यवाही करीता तलाठी सज्जा परभणी पुर्व यांचे खाजगी कार्यालयात खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी यांची भेट घेवुन सापळा कार्यवाही करीता पंच क्र. 01 शिंदे यांचेसह मोटार सायकलने रवाना झालो व आमचे पाठोपाठ संपुर्ण सापळा पथक आले. सदर सापळा कार्यवाही दरम्यान खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी यांनी मला माझे नावावर झालेल्या सातबारा ची एक प्रत देवुन 'काही नाही राहुद्या तुमच काम होन महत्वाच'असे म्हणुन लाच रक्कम स्विकारली नाही. त्यामुळे खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी हे माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाही याची मला खात्री झाली.
तरी दि. 11/09/2023 रोजी 13.52 ते 14.18 वा. दरम्यान खाजगी इसम हर्षवर्धन सुर्यवंशी यांनी शिवरामनगर, परभणी येथील तलाठी सज्जा परभणी पुर्व यांचे खाजगी तलाठी कार्यालया समोरील ओटयावर बाजुस घेवुन मला माझे प्लॉटचे फेरफार करून सातबारावर नोंद करण्याकरीता 15,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोड अंती 7,000/- रू स्विकारण्यास सहमती दर्शवली म्हणुन माझी हर्षवर्धन प्रकाश सुर्यवंशी वय 28 वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी तलाठी सज्जा परभणी पुर्व रा. वर्मा नगर, परभणी यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.
माझी फिर्याद माझे सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली. त्याची प्रिंट काढून मला वाचण्यास दिली ती मी वाचुन पाहिली. माझे सांगणेप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

फिर्याद दिली सही

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

subhash lachamanna anmulwar(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Bawale

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): subhash lachamann
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
नवा मोंढा पोलीस स्टेशन परभणी